राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक
पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.
Website- www.sic.maharashtra.gov.in

सूचना का अधिकार

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र :३५०/२०२३/नाशिक**

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी |
|---|---|
| श्री. नारायण शांताराम कसबे,<br>रा.मु. पो. वाडगाव, ता. जि. नाशिक – ४२२२०३. | जमाबंदी अव्वल कारकून, तहसील कार्यालय, नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय आवार, जुना मुंबई-आग्रा रोड, सी.बी.एस. जवळ, नाशिक, ता. जि. नाशिक-४२२००२. |

**सुनावणी दिनांक १०/०६/२०२५**

तक्रारदार यांनी दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०/०६/२०२५ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार व तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. तर विद्यमान जन माहिती अधिकारी हे उपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दि. ०८/०३/२०२३ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारली असल्याने, संबंधितावर दंड लावण्यात यावा तसेच, माझी विनंती सातत्याने आणि वाजवी कारणाशिवाय नाकारण्याऱ्या PIO विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करा सेवा आचार नियम आणि शिस्त अपील नियम १९६८ आणि १९६९ अंतर्गत PIO ला शिक्षा करा आणि त्याच्याविरुध्द कठोर शिस्तभंगाची कारवाई करा."

३) तक्रारदार यांनी दि. ०८/०३/२०२३ रोजीच्या माहिती अर्जान्वये, दिनांक १०/०१/२०२३ या कालावधीतील अनुक्रमे पुढीलप्रमाणे माहिती मागितली होती.

१) म.ज.म.अ. कलम १५५ अन्वये दुरुस्ती होणेबाबत
२) अर्ज. क्र.अधि/अभि/कावि/२०२३/२०२२
३) दि. १०/०१/२०२३ रोजी सुनावणी पासून आदेशाचे नक्कल मिळणेबाबत
४) दि. १७/०२/२०२३ रोजी केलेल्या अर्जाची आदेश नक्कल मिळणेबाबत.
५) तहसिलदार यांच्या आदेशाची नक्कल.

४) सुनावणी दरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले की, तक्रारदार यांच्या दि. ०८/०३/२०२३ रोजी माहिती अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि. २९/०३/२०२३ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक उत्तर तक्रारदार यांना कळविले आहे. त्यांनी आयोगास सादर केलेल्या दि. २९/०३/२०२३ च्या पत्रात असे नमूद केले आहे की, "माहिती अधिकारी कक्षेत कागदपत्र स्वरुपात माहिती मागणे अपेक्षित आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीचा अर्ज ज्यावेळी प्राप्त होतो त्यावेळी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे तसेच माहिती ज्या स्थितीत उपलब्ध आहे ती त्याच स्थितीत उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे. माहिती तयार करुन देणे, माहिती दुसऱ्या कार्यालयाकडून प्राप्त करुन करुन देणे,

माहिती तयार करुन देणे, माहितीचे संस्करण करुन देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, माहिती तक्त्यामध्ये उपलब्ध करुन देणे, एखाद्या कार्यवाहीमागील कारणे/ खुलासा देणे या प्रक्रियेचा अथवा या स्वरुपातील माहितीचा अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येत समावेश होत नसल्यामुळे अशी माहिती अर्जदार/ अपिलार्थी यांना देय होत नाही. या बाबी यात येत नाही. माहिती अधिकार कायद्याच्या कलम ८ व ९ मध्ये अपवाद केलेल्या माहिती शिवाय आपल्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या सर्व माहितीचा समावेश या व्याखेत होतो. माहिती प्रकट करण्याबाबत (क) (ख) (ग) (च) (छ) (ज) नुसार किंतू परंतू करण्यास वावच नाही. तरी प्रकरणी निर्णय पारीत न झाल्याने आपल्याला माहिती पुरविणे शक्य नाही."

सुनावणीवेळी आयोगास सादर केलेल्या दि. १०/०६/२०२५ रोजीच्या पत्रात असे स्पष्ट केले आहे की "या कार्यालयाचे क्र. अधि/अभि/कवि/९९८/२०२४ दि. २०/०२/२०२५ रोजी निकालाचे सुचनापत्र तक्रारदार यांना देण्यात आलेले आहे."

५) सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व प्रस्तुत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, तक्रारदार यांच्या दि. ०८/०३/२०२३ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दि. २९/०३/२०२३ च्या पत्रान्वये वस्तूस्थितीदर्शक उत्तर तक्रारदार यांना कळविल्याचे दिसते. तसेच, तक्रारदार हे प्रत्यक्ष सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांनी सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कोणतेही गांभीर्य नसल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे सदर तक्रार पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकारणी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत तक्रार क्र. ३५०/२०२३/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

**जावक क्र** ८९०८ 19 NOV 2025